# धोंडराई गावातील स्मशानभूमीचा प्रश्न गेला टोकाला: ‘महाराष्ट्र आरंभ’च्या विरोधात सरपंचांची फेसबुक पोस्ट?

## गावातील इतर विकासकामांसाठी निधी मिळतो, मग स्मशानभूमीसाठी का नाही?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं. दैनिक
महाराष्ट्र आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## गरिबांचे घर नाही, मृतांचे स्मशान नाही मग ग्रामपंचायतीने नेमकं दिलं तरी काय?

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – ३३१ ■ मंगळवार दि.१९ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 331 ■ Tuesday Dt. 19 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# गावाच्या विकासाबद्दल गप्पा मारणाऱ्या विद्यमान सरपंच आणि पुढाऱ्यांनी कधी एकत्र येऊन या प्रश्नावर ठाम भूमिका घेतली का?

## सत्य लिहिणाऱ्यांवर टीका करण्याऐवजी मृतांना सन्मानजनक अंत्यसंस्काराची जागा का देत नाहीत?

**गेवराई । महाराष्ट्र आरंभ न्यूज**
धोंडराईसारख्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या गावाला स्वातंत्र्यानंतर अनेक दशके उलटूनही आजतागायत स्मशानभूमी नाही, ही गावकऱ्यांसाठी लज्जास्पद व वेदनादायक बाब ठरत आहे. मृतदेहांना उघड्यावर अग्नी द्यावा लागत असून, विशेषतः पावसाळ्यात अंत्यसंस्कार करताना कुटुंबीयांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. इतकेच नाही तर अंत्यसंस्कार स्थळापर्यंत पोहोचण्यासाठी जवळपास एक किलोमीटर पायपीट करावी लागते. यावर १८ ऑगस्ट रोजी दैनिक महाराष्ट्र आरंभ ने या रेंगाळलेल्या प्रश्नावर थेट आवाज उठवला.
लोकप्रतिनिधी गावच्या मूलभूत प्रश्नांवर का गप्प आहेत? असा थेट सवाल करत वृत्तपत्राने सत्य परिस्थिती मांडली. मात्र ही वस्तुस्थिती विद्यमान सरपंच आणि त्यांच्या समर्थकांना चांगलीच झोंबली. परिणामी, दुसऱ्याच दिवशी सरपंचांनी फेसबुक पोस्टद्वारे वृत्तपत्राच्या टीमवर आरोप-प्रत्यारोप करून निशाणा साधल्याचे उघडकीस आले. फेसबुक पोस्टमध्ये सरपंचांनी उल्लेख केला आहे की, ग्रामपंचायत कार्यालयाने वारंवार पाठपुरावा केला तरी वरिष्ठ पुढाऱ्यांकडून निधी मिळत नाही. मात्र ग्रामस्थांचे म्हणणे वेगळे आहे. गावातील इतर विकासकामांसाठी निधी सहज मिळतो, मग मृतांच्या सन्मानासाठी आवश्यक असलेल्या स्मशानभूमीसाठी निधी का नाही मिळाला?सरपंच आणि स्थानिक प्रतिनिधींनी कधी एकत्र येऊन या प्रश्नावर ठाम भूमिका घेतली का? धोंडराईसारख्या मोठ्या गावात स्मशानभूमी नसणे ही प्रशासनाची व गावच्या नेतृत्वाची मोठी तफावत आहे.

### सरपंचांच्या समर्थकांकडून पत्रकाराला धमकी; पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर गदा!

धोंडराई ग्रामपंचायत कार्यालयातील भ्रष्ट व अनागोंदी कारभारावर सातत्याने आवाज उठवणाऱ्या दैनिक महाराष्ट्र आरंभ या जिल्हा दैनिकाच्या तालुका प्रतिनिधी शुभम घोडके यांना सरपंचांच्या समर्थकांकडून थेट धमकी दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. फोनवर बोलत असताना सरपंचांच्या समर्थकांनी, सरपंचांच्या विरोधात बातम्या प्रकाशित केल्यास तुमच्यावर मानहानीचा गुन्हा दाखल करू, न्यायालयात खेचू, मग कळेल पत्रकाराला काय कनका असतो असे धमकावल्याची माहिती पुढे आली आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून सामान्यांना न्याय मिळवून देण्याच्या ध्येयाने कार्यरत असलेले दैनिक महाराष्ट्र आरंभ अल्पावधीतच महाराष्ट्रभर लोकप्रिय झाले आहे. मात्र धोंडराई ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्या बातम्यांमुळेच हा दबाव व धमकीचा प्रकार घडल्याची चर्चा सुरू आहे. या घटनेने पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पत्रकारांना गप्प बसवण्यासाठी धमकीचा मार्ग अवलंबला जात आहे का? असा ज्वलंत सवाल उपस्थित झाला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून पत्रकाराचे संरक्षण करणे, तसेच धमकी देणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, अशी मागणी पत्रकार संघटनांकडून होण्याची दाट शक्यता आहे.



### दै. महाराष्ट्र आरंभ’च्या पत्रकारांनी पैसे घेतलेत का? हे विद्यमान सरपंचांनी सिद्ध करून दाखवावे!

#### सरपंच.. आरोप करणं सोपंय, सिद्ध करणं कठीणय?

धोंडराई ग्रामपंचायतीतील भ्रष्ट कारभार उघडकीस आणणाऱ्या दैनिक महाराष्ट्र आरंभ या वृत्तपत्रावर विद्यमान सरपंचांनी थेट सोशल मीडियावर गंभीर आरोप केले आहेत. फेसबुकवर दैनिक आरंभचे वृत्तपत्राचे कात्रण पोस्ट करून सरपंचांनी लिहिले आहे की, फक्त दोन पैशांसाठी सरपंचाचे नाव खराब करण्याचे काम दैनिक आरंभ करत आहे. या पोस्टनंतर सरपंचांच्या वक्तव्यामुळे गावात व पत्रकारितेत खळबळ उडाली आहे. पत्रकारांनी पैसे घेतलेत की नाही, हा प्रश्नच जर असेल, तर त्याचा निर्णय न्यायालय किंवा संबंधित तपास यंत्रणा करतील. मग यावर वैयक्तिक बोलण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला? पत्रकारितेवर अविश्वास दाखवून सरपंच स्वतःची बाजू कमजोर करत आहेत, अशी गावभर चर्चा आहे. आरोप सोपे आहेत, पण पुरावे कुठे आहेत? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. दैनिक आरंभचे म्हणणे स्पष्ट आहे. जर आम्ही पैसे घेतले आहेत असे सिद्ध झाले, तर आम्ही तुमचा सन्मान करून प्रामाणिकपणासाठी पुरस्कार जाहीर करू, पण तुम्ही आरोप सिद्ध करू शकत नसाल, तर जनतेसमोर माफी मागावी. आता नागरिक प्रश्न विचारू लागले आहेत की, सत्य उघड केल्यावर पत्रकारांना बदनाम करणं म्हणजे सरपंचांच्या कारभारात काहीतरी काळंबेरं आहे का? या आरोप-प्रत्यारोपांमुळे धोंडराई ग्रामपंचायत परिसरात एकच खळबळ उडाली असून, पत्रकारितेच्या स्वातंत्र्याला गळा घालण्याचा प्रयत्न होत आहे का? असा प्रश्न अधिक तीव्रतेने पुढे येत आहे.




---

### रामाच्या कथा सांगता सांगता त्याच तलवड्याच्या कचरे महाराज ने राम मंदिराची जागा हडप केली

## रामकथा वाचून लोकांना ज्ञान सांगणाऱ्या महाराजाला ग्रामपंचायत कडून नोटीस

**तलवाडा । महाराष्ट्र आरंभ न्यूज**
राममंदिराच्या जागेवर तलवाडा येथील माजी ग्रामपंचायत सदस्याचा पती आणि स्वतःला महाराज समजणारे गणेश कचरे यांनीच अतिक्रमण केले असल्याची तक्रार गोसावी देविदास यांनी दिल्या नंतर ग्रामपंचायत प्रशासक आणि ग्रामसेवक यांनी त्यांना नोटीस काढून अतिक्रमण काढावे नसता कायदेशीर कार्यवाही करण्याचा इशारा दिला आहे. याआधी ही गोसावी देविदास यांनी तक्रार दाखल केली होती.


नोटीस

याबाबत सविस्तर असे की, तलवाडा येथे श्रीरामाचे मंदिर आहे. या मंदिराला उत्तर दिशेला दर्शनाचा आणि रहदारीचा दरवाजा असून दक्षिण दिशेला ही मंदिरातील पुजारी गोसावी महाराज यांना समाधी पूजन करण्यासाठीचा दरवाजा आहे. त्या दरवाजा समोरील सहन जागेवर माजी ग्रामपंचात सदय पती आणि लोकांना ज्ञान सांगणारे महाराज गणेश कचरे यांनी अतिक्रमण केले असल्याची तक्रार ७ ऑगस्ट रोजी गोसावी देविदास वामनबुवा यांनी केली असल्याने गणेश कचरे यांना १३ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत प्रशासक आणि ग्रामसेवक यांनी नोटीस देऊन अतिक्रमण काढण्या संदर्भात सूचित केले आहे जर अतिक्रमण काढले नाही तर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असे ही नोटीसमध्ये म्हटले आहे. या अगोदर ही गोसावी देविदास यांनी गटविकास अधिकारी आणि ग्रामपंचायत यांना या संदर्भात तक्रारी अर्ज दिला होता. परंतु कार्यवाही झाली नव्हती त्यामुळे आता अतिक्रमण काढण्यात येते की ग्रामपंचायत कोणती कायदेशीर कार्यवाही करून झालेले अतिक्रमण काढते हे पहावे लागेल.

---

## बीडमधील शेतकरी संकटात; केंद्राकडून मदतीचा हात द्या

### खा. बजरंग सोनवणेंनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून केली मागणी

**बीड । महाराष्ट्र आरंभ न्यूज**
बीड जल्ह्यात मागील चार दिवसांपासून पाऊस जोरदार हजेरी लावत असून जल्ह्यामधील बहुतेक सर्वच महसुल मंडळामधे अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. शेतातील पिके पाण्यात आहेत. दोन दिवसांपुर्वी खा. बजरंग सोनवणे यांनी थेट शेतात जावून नुकसानीची पाहणी केली होती. आज दि.१९ रोजी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची दल्लि येथे भेट घेवून अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून मदतीचा हा द्या, अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी केली.
बीड जल्ह्यातील शेतकरी बांधवांवर अतिवृष्टीमुळे मोठे संकट ओढावले आहे. राहती घरे, पीक, पशुधन, शेतीजमीन तसेच फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून तातडीने मदत मिळावी, यासाठी खा. सुप्रिया सुळे यांच्या सोबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन सवस्तिर निवेदन सादर केले. मागील काही दिवसांपासून जल्ह्यात संततधार आणि मुसळधार पावसाची नोंद झालेली असून जल्ह्यातील नद्यांना पूर गेलेला आहे. नदीपात्रापासून एक किलोमीटर अंतरापर्यन्त पिके पाण्याखाली आहेत. पावसामुळे पिकांचे, शेतीचे आणि घरांची पडझड होवूनही



मोठी हानी झालेली आहे. केज तालुक्यातील काही गावात मांजरा नदीच्या पात्रातील पाणी शिरले होते. या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे आणि शेतीचेही नुकसान झाले होते. यानंतर तातडीने खा. बजरंग सोनवणे यांनी पूर्वनियोजीत दौरा रद्द करून आणि शेतीचेही नुकसान झाले होते. यानंतर तातडीने खा. बजरंग सोनवणे यांनी पूर्वनियोजीत दौरा रद्द करून शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतात जावून पिकांची आणि नुकसानीची पाहणी केली होती. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांनी धीर दिला होता. यानंतर मुख्यमंत्री आणि कृषीमंत्री यांना निवेदन पाठवून पंचनामे करणे व मदतीची मागणी केली होती. आज दि.१९ रोजी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून केंद्र सरकारच्या वतीने तातडीने मदत

पान २ वर

---

### केज तालुक्यात आरोग्य विभागाचा अजबच प्रकार

## कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी महिलांना करु लागले बळजबरी

**केज । महाराष्ट्र आरंभ न्यूज**
प्राथमिक आरोग्य केंद्र विडा परिसरातील गावागावांत आशा स्वयंसेविका घराघरात जाऊन कुटुंबातील महिलांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी सक्ती करु लागल्या आहेत. आशा स्वयंसेविका कुटुंबातील महिलांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी प्रवृत्त करण्या बरोबरच बळजबरी पण करु लागल्या आहेत. महिलांचे फोटो काढणे सह्या घेणे प्रकार सुरू केला आहे. त्यामुळे विडा परिसरात महिला दडपणाखाली आल्या आहेत. आशा स्वयंसेविकांना गावातील महिला सही देत नाहीत म्हटले तर त्या म्हणतात तुमच्या सर्व योजना सरकार बंद करणार आहे. हा अजब च प्रकार पाहून महिला घाबरून गेल्या आहेत.




या प्रकरणी काय गोड बंगाल आहे हे आरोग्य विभागाने तातडीने स्पष्ट केले पाहिजे असे या भागातील लोक म्हणत आहेत. आज लहुरी आणि परिसरातील गावागावांतून लोक म्हणत आहेत की हा प्रकार तातडीने थांबला पाहिजे सध्या सगळी कडे कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेच्या या प्रकरणी लोक दडपणा खाली आले आहेत. तरी तालुका वैद्यकीय अधिकारी केज आणि विडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी यांनी आशा स्वयंसेविकांना हा प्रकार थांबविण्यास तातडीने सुचना द्याव्यात अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या विषयात जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी लक्ष वेधले पाहिजे असे हि लोक बोलत आहेत.

# रमाई घरकुल योजनेत बेकायदेशीर अडथळे, लाभार्थ्यांकडून खरेदीखत व पी.आर. कार्डची सक्ती

## मुख्याधिकारींवर तात्काळ कारवाईची मागणी



बीड । महाराष्ट्र आरंभ न्यूज
बीड नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या रमाई घरकुल आवास योजनेत लाभार्थ्यांना हक्काचा लाभ मिळण्यात गंभीर अडथळे निर्माण होत असल्याचे उघड झाले आहे. शासनाने मंजूर केलेला निधी नगरपरिषदेकडे उपलब्ध असूनही लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट वर्ग न करता मुख्याधिकारींकडून बेकायदेशीर अटी लादल्या जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्राप्त माहितीनुसार, मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी लाभार्थ्यांकडून खरेदीखत व पी.आर. कार्ड सादर करण्याची सक्ती केली असून शासन निर्णयात अशा अटींचा कोणताही उल्लेख नसतानाही त्यांची जबरदस्ती केली जात आहे. या प्रकारामुळे अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना योजनेंतर्गत निधी मिळण्यात प्रचंड विलंब होत आहे. याशिवाय, मुख्याधिकारी सौ. नीता अंधारे यांनी शासकीय संचिका आपल्या निवासस्थानी ठेवून शासन कामकाजात अडथळा निर्माण केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.
ही संपूर्ण बाब जातीय मानसिकतेतून प्रेरित असून, दुर्बल व वंचित घटकांना योजनेंतर्गत निवारा नाकारण्याचा प्रयत्न आहे. लाभार्थ्यांकडून थेट रोख रकमेची मागणी होत असल्याच्या तक्रारी देखील प्राप्त झालेल्या आहेत. या अमान्य व बेकायदेशीर प्रकारामुळे लाभार्थ्यांमध्ये प्रचंड संतापाची लाट असून शासनाने तात्काळ कठोर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे: मुख्याधिकारी सौ. नीता अंधारे यांनी शासकीय संचिका निवासस्थानी नेल्याबाबत चौकशी करून शिस्तभंगाची कारवाई करावी, मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी लाभार्थ्यांकडून बेकायदेशीर अटी लादल्याबद्दल व निधी वितरणात अडथळे आणल्याबद्दल त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना योजनेंतर्गत लाभ नाकारल्याबाबत सदर प्रकरण ट्रॉसिटी क्ट अंतर्गत नोंदवून कठोर दंडात्मक कारवाई करावी, रमाई घरकुल योजनेतील प्रलंबित प्रस्ताव तातडीने मंजूर करून निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावा. यावेळी जिल्हाध्यक्ष अजय सरवदे बाबुराव मस्के, खंडू नाना जाधव, ज्ञानेश्वर कवठेकर, किरण वाघमारे, जंजाळ सर, लखन जोगदंड, मिलिंद सरपते, प्रकाश उजगरे, आदी उपस्थित होते.

## नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या : खा. रजनी पाटील

केज । महाराष्ट्र आरंभ न्यूज



चार दिवसापासून बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर खा. रजनीताई पाटील यांनी प्रशासनाला तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी केली आहे. शेती हा शेतकऱ्यांचा मुख्य आधार आहे. पाऊस, नैसर्गिक आपत्तीमुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून त्याला तात्काळ मदतीची गरज आहे. नुकसानग्रस्त भागांचा तातडीने पंचनामा करून शेतकऱ्यांना मदत मिळाली पाहिजे, असे त्या म्हणाल्या.
पुढे बोलताना खा. पाटील म्हणाल्या की, शासनाने तत्परतेने कार्यवाही केली नाही तर शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक बिकट होईल. त्यामुळे प्रशासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणे ही काळाची गरज आहे. शासनाच्या विविध योजनांमधून तसेच आपत्ती व्यवस्थापन निधीतून तातडीने मदत देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून सर्व स्तरांवर लढा देण्याचा निर्धार खा. रजनीताई पाटील यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव बांधील असून, नुकसान भरपाई मिळेपर्यंत पाठपुरावा करत राहणार असल्याचे सांगितले.

## ग्रामविकास अधिकारी विजयकुमार मस्के यांची विस्तार अधिकारी पदी पदोन्नती

तलवाडा । महाराष्ट्र आरंभ न्यूज
गेवराई पंचायत समिती अंतर्गत मादळमोही ग्रामपंचायत या ठिकाणी कार्यरत



असलेले ग्रामविकास अधिकारी विजयकुमार मस्के यांची केज पंचायत समिती याठिकाणी विस्तार अधिकारी म्हणून पदोन्नती झाली असून त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.
गेवराई तालुक्यात पंचायत समिती कार्यालय अंतर्गत मादळमोही, तलवाडा यासारख्या मोठ्या ग्रामपंचायत चा कारभार अत्यंत यशस्वी आणि पारदर्शक पाने चालवणारे, सामान्य नागरिकांना आपुलकीची वागणूक देऊन त्यांच्या कामांना प्राधान्य देत प्रशासकीय स्तरावर अत्यंत कुशल पाने काम मार्गी लावण्याचे काम विजयकुमार मस्के यांनी आजपर्यंत केले असून त्या त्यांच्या पंचायत समिती स्तरावरून ग्रामविकास अधिकारी संवर्गातून केज पंचायत समिती कार्यालय याठिकाणी विस्तार अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## आडस येथे मोटार रिवाईंडींग दुकान फोडून चोरी

धारूर । महाराष्ट्र आरंभ न्यूज
आडस येथील पांचाळ मशनरी अ‍ॅन्ड मोटार रिवाईंडींग या दुकानाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी मोठी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शुभम वैजीनाथ पांचाळ (वय ३०, रा. आडस, ता. केज, जि. बीड) यांनी धारूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि. १६ ऑगस्ट रोजी रात्री सुमारास शुभम पांचाळ यांनी आपले मोटार रिवाईंगचे दुकान बंद करून घरी गेले होते. दुसऱ्या दिवशी पहाटे त्यांच्या वडिलांनी दुकान साफ करण्यासाठी गेल्यावर शटरचे कुलूप तोडलेले व शटर उघडे असल्याचे दिसून आले. तातडीने शुभम पांचाळ यांना याची माहिती देण्यात आली.



पुढे दुकान तपासल्यावर आतल्या वस्तू अस्ताव्यस्त अवस्थेत पडलेल्या होत्या. तपासणी केली असता सममर्सिबल वायडिंग तांबे वायरचे सात बंडल, ग-ढशलह या कंपनीच्या विविध एचपीच्या तीन मोटारी, दुरुस्तीकरिता आलेल्या आठ जुना मोटारी तसेच स्क्रॅप वायडिंग तांबे वायर असा एकूण सुमारे १ लाख २ हजार ८३५ रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे उघड झाले. घटनेची माहिती मिळताच पोलीसांनी पंचनामा करून तपास सुरू केला आहे. अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## दोन वर्षांच्या लेकीला गळफास देऊन आईनेही संपवले जीवन

**गेवराई । महाराष्ट्र आरंभ न्यूज**
गेवराई तालुक्यातील मालेगाव येथे सोमवारी घडलेल्या घटनेने गाव हादरले आहे. दोन वर्षांच्या मुलीला गळफास देऊन आईनेही आत्महत्या केल्याची माहिती समोर आली असून परिसरात शोककळा पसरली आहे.
अंकिता बळीराम घवाडे (वय २५) आणि तिची लेक शिवप्रीती (वय २) अशी मृत मायलेकींची नावे आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, सोमवारी दुपारी ही घटना घडली. श्रावणातील शेवटचा सोमवार असल्याने घरातील सर्व सदस्य जुने मालेगाव येथे धार्मिक कार्यक्रमाला गेले होते. त्या वेळी अंकिता व तिची मुलगी घरी होत्या. दुपारी दोनच्या सुमारास अंकिताने मुलगी शिवप्रीतीला गळफास दिला. ती मृत झाल्यानंतर तिने स्वतःही गळफास घेऊन जीवन संपविले. या दोघींचे मृतदेह बीडच्या शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत. घटनेचे नेमके कारण समजले नसून तपासानंतरच खरे कारण स्पष्ट होईल, अशी माहिती तलवाडा पोलिसांनी दिली. या दुर्दैवी घटनेने मालेगाव गाव तसेच परिसरात हळहळ व्यक्त होत असून ग्रामस्थांमध्ये शोककळा पसरली आहे.

## संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना जामीन मिळणार ?; ३० ऑगस्टला फैसला

बीड । महाराष्ट्र आरंभ न्यूज
बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आज विशेष मकोका कोर्टात सुनावणी झाली. त्यात आरोपींच्या वकिलांनी आपल्या अशिलांचा या प्रकरणाशी कोणताही संबंध नसल्याचा दावा करत त्यांना जामीन मंजूर करण्याची विनंती केली. पण फिर्यादी पक्षाने हे अत्यंत गंभीर प्रकरण असल्याचे नमूद करत आरोपींना कोणताही दिलासा देण्यास कडाडून विरोध केला. त्यामुळे कोर्टाने आपला फैसला ३० ऑगस्टपर्यंत राखून ठेवला. आता या प्रकरणातील आरोपींना जामीन मिळणार की ते तुरुंगातच खितपत राहणार याचा फैसला या महिन्याच्या शेवटी होणार आहे.
संतोष देशमुख यांची गतवर्षी ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू समजल्या जाणाऱ्या वाल्मीक कराडसह इतर आरोपींना अटक केली होती. या सर्वांनी आता जामिनीसाठी अर्ज दाखल केला आहे. त्यांच्या याचिकेवर आज विशेष



मकोका कोर्टात सलग ३ तास सुनावणी झाली. त्यात वाल्मीक कराडच्या वकिलाने १ तास ४५ मिनिटे युक्तिवाद करत जामिनाची मागणी केली. विशेषतः वाल्मीक कराड याला अटक करताना कोणतेही कारण देण्यात आले नव्हते, अशी बाबही त्यांनी यावेळी कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी जोरदार हरकत घेतली. तसेच आवादा कंपनीचे कर्मचारी सुनील शिंदे यांनी रेकॉर्ड केलेल्या फोन कॉलची तारीख चुकीची असल्याचा आरोपींचा युक्तिवादही त्यांनी सीडीआर दाखल करून जोरकसपणे फेटाळून लावला. सीडीआरनुसार वाल्मीक कराडने त्या दिवशी सुनील शिंदे यांना फोन केला होता. त्याची नोंद आहे. या संभाषणाशी संबंधित पुरावे योग्यवेळी कोर्टात सादर केले जातील, असे ते म्हणाले.
यावेळी आरोपी विष्णू चाटे याच्याही वकिलांनी आपली बाजू मांडली. आपल्या अशिलावर कोणताही गुन्हा दाखल नसल्याचा दावा त्यांनी केला. पण उज्ज्वल निकम यांनी त्यांच्या या दाव्यावरही जोरदार हरकत नोंदवली. विष्णू चाटे हा वाल्मीक कराडचा राईट हँड आहे. त्याने वाल्मीकला पूर्ण मदत केली. त्यामुळे मकोका कायद्याच्या तरतुदी या गुन्ह्याला लागू होतात आरोपीला नाही, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी विष्णू चाटेची गुन्हेगारी पार्श्वभूमीच कोर्टापुढे मांडत आरोपीचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली. यामुळे विष्णू चाटेच्या वकिलांची चांगलीच पंचाईत झाली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आपला निर्णय ३० ऑगस्टपर्यंत राखून ठेवला. त्या दिवशी आरोपींना जामीन मिळतो की त्यांना तुरुंगातच रहावे लागेल हे स्पष्ट होणार आहे. दरम्यान, वाल्मीक कराडच्या वकिलांनी या प्रकरणी हायकोर्टाचे दार ठोठावण्याचे संकेत दिलेत.

## महाराष्ट्रात सर्वदूर मुसळधार पाऊस

मुंबई । महाराष्ट्र आरंभ न्यूज
मागील काही दिवसांपासून दडी धरून बसलेला पाऊस अखेर आत्ता महाराष्ट्रात परतला आहे. आज सोमवारी पहाटेपासूनच मुंबईसह सर्वदूर महाराष्ट्रात पावसाच्या जोरधारा कोसळत आहेत. परिणामी, राज्याच्या आर्थिक राजधानीतील सखल भागांत पाणी साचल्यामुळे नागरिकांची त्रेधातिरपीट उडाली आहे. मराठवाडा, विदर्भ, खानदेशासह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे गरज असेल तरच घराबाहेर पडण्याचे आवाहन प्रशासनातर्फे केले जात आहे.
मुसळधार पावसामुळे उद्भवलेल्या पूरस्थितीमुळे मराठवाड्यात ६ जणांचा मृत्यू झाला आहे. यात नांदेड जिल्ह्यातील ३, बीड जिल्ह्यातील २ व हिंगोली जिल्ह्यातील एका व्यक्तीचा समावेश आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथे पावसामुळे बिकट स्थिती निर्माण झाल्यामुळे तिथे लष्कराला पाचारण करण्यात आले आहे. पुण्यातूनही २० जणांचे एक पथक मागवण्यात आले आहे. एनडीआरएफचे एक पथक बीडमध्ये मदतकार्य करत आहे. तर एसडीआरफची २ पथकने नांदेडमध्ये कार्यरत आहेत. मराठवाड्यातील ५७ मंडळांत अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे सरकारने स्थानिक प्रशासनाचा स्थिती पाहून शाळांना सुट्टी देण्याची सूचना केली आहे. पुढील ३-४ तासांत छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, जळगाव जिल्ह्यात काही ठिकाणी मध्यम ते जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. वादळी वारे मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याची माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईसह



महाराष्ट्रातील पाऊसमानाचा आढावा घेतला. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी आज सोमवारी सायंकाळी ६ वाजेनंतर समुद्रात किमान ३ ते ४ मीटर उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता असल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, आज सायंकाळी सहा-साडेसहानंतर समुद्रात किमान तीन मीटरच्या लाटा उसळतील. त्यानंतर उद्या चार मीटरपर्यंत लाटा उसळण्याची शक्यता आहे. सध्या भरतीचा काळ आहे. या काळात मोठ्या प्रमाणात पाऊस असेल. त्यामुळे समुद्राची आणि नाल्यांची पातळी सारखी असेल. आपल्याला मोठ्या प्रमाणात पाणी पंपिंग करावे लागेल. याची व्यवस्था मुंबई पालिकेने तयार केली आहे. लोकांनी काळजी घ्यावी. लाटा पाहण्याच्या मोहापाई लोक अडचणीत येतात, असे म्हणत त्यांनी नागरिकांना समुद्रापासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.



## धार्मिक सण, उत्सवातून सामाजिक एकोपा टिकून दिसतोय : बाळासाहेब ठाकट

**पात्रुड येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सण उत्साहात साजरा**

पात्रूड । महाराष्ट्र आरंभ न्यूज
धार्मिक सण उत्सवातून सामाजिक एकोपा दिसून येत असल्याचे मत शिवसेवा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते, बाळासाहेब ताकट यांनी पात्रुड येथील दहीहंडीच्या कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी त्यांनी मत व्यक्त केले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पात्रुडचे सरपंच लतीफ मोमीन होते तर प्रमुख उपस्थितीत माजी सरपंच एकनाथ मस्के, ग्रामविकास अधिकारी भागवत भुजबळ, अशोक आगरकर, पत्रकार प्रकाश यादव, बाळासाहेब बनकर, विलास मोरे, यांच्या सह गावातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते.
पुढे बोलताना बाळासाहेब ताकट म्हणाले की, भारतीय संस्कृती ही सुरुवातीपासूनच सर्व समावेशक आहे. वर्षभरातील वेगवेगळ्या धर्मातील संस्कृतीत कार्यक्रम हा समतेचा एकोपा टिकवण्यासत नवतरुण दिसत असल्याचे समाधान वाटत आहे असेही मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ऋषिकेश नाटकर, गणेश सितकर, सय्यद अन्वर, रोहित फरांडे, गणेश आगरकर, साऊंड सिस्टम ऑपरेटर सौरभ बनकर, बालूमामा काळे, सारंग मगर, ऋषिकेश वखरे, माऊली वखरे, दीपक रासवे, अनिकेत बोचरे, अक्षय मोरे, चंद्रकांत गोमचाळे,यांनी मेहनत घेतली.व श्रीकृष्ण जन्माष्टमी चा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.

## लाडकी बहीण योजनेसंदर्भात फेक लिंकपासून सावधान

### सोशल मीडियावरील व्हायरल बातम्यांवर विश्वास ठेऊ नका

पात्रुड । महाराष्ट्र आरंभ न्यूज
राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या लाडकी बहीण योजनेसंदर्भात मोठी अपडेट समोर येत आहे. या योजनेच्या नावे काही फेक साईट, फ ऋक लिंक व्हायरल होत आहेत. त्या माध्यमातून डेटाही चोरी होण्याची शक्यता आहे. तसेच अपात्र म हिलांची नावे कशी तपासायची या संदर्भातही काही बातम्या व्हायरल होत आहेत. पण तशी कोणतीही सुविधा लाडकी बहीण योजनेच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांनी वा ज्यांच्या खात्यात जून महिन्याचे पैसे आले नाहीत त्यांनी चुकीच्या माहितीला बळी पडू नये. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून दर महिन्याला राज्य सरकारच्या वतीने लाभार्थी महिलांच्या नावे १५०० रुपये दिले जातात. पण या योजनेचा गैरफायदा काही पुरुषांनी आणि श्रीमंत महिलांनीही घेतल्याचं निदर्शनास आलं.
त्याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने छाननी करून नुकतंच २६.३४ लाख महिला अपात्र ठरवल्या आहेत. जून महिन्याम ध्ये त्यांच्या खात्यावर पैसे हस्तांतरित करण्यात आले नाहीत. सरकारने जरी काही महिलांना अपात्र केलं असलं तरी वेबसाईटवर अपात्र म



हिलांची यादी तपासण्यासाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. जर एखादी महिला या योजनेसाठी पात्र असेल तर तिला तिच्याशी संबंधी सर्व वैयक्तिक माहिती मिळू शकते. तिला कोणत्या महिन्याचा हप्ता खात्यावर जमा झाला हे पाहता येईल.लाडकी बहीण योजनेसंबंधी अपात्र महिलांची यादी तपासता येत नाही. त्यामुळे या संदर्भात ज्या काही फेक बातम्या आणि व्हिडीओ व्हायरल होत आहेत त्यावर विश्वास ठेऊ नये असं आवाहन करण्यात येत आहे मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण' योजनेतील पात्र महिलांना रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येस जुलैचा निधी खात्यात जमा होणार आहे. महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरेंनी एक्स पोस्टद्वारे ही माहिती दिली.

**फेक लिंक व्हायरल**

या पार्श्वभूमीवर लाडकी बहीण योजनेसंबंधी काही फेक साईट व्हायरल होत आहेत. तसेच आपण पात्र आहोत की अपात्र आहोत हे तपासण्यासाठी काही फेक लिंकही व्हायरल केल्या जात आहेत. त्यासाठी आधार कार्डचा वापर करावा असं सांगत आधार नंबर घेतला जात असल्याचं निदर्शनास आलं आहे. त्या माध्यमातून मोठा डेटाही चोरीला जाण्याची शक्यता आहे.

## रमाई कॉलनी दलित वस्तीपासून अजून कोसोदूर : शहादेव वंजारे

बीड । महाराष्ट्र आरंभ न्यूज



शहरातील प्रकाश आंबेडकर नगर भागात रमाई कॉलनी आहे. मात्र अनेक वर्षांपासून हा भागात विकास कामांपासून वंचित आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या भागात अनेक गोर गरीब नागरिक राहतात. मात्र त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कोणीच पुढाकार घेताना दिसत नाही. रमाई कॉलनी हा भाग दलित वस्ती अंतर्गत येत असल्याने याभागात विकास कामे होणे अपेक्षित होते. शासनाकडून दलित वस्ती सुधार योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी दिला जातो.मात्र अजून तरी रमाई कॉलनी ला दलित वस्ती योजनेचा लाभ मिळालेला नाही.

पान १ वरून...

### बीडमधील शेतकरी संकटात...

द्यावी, अशी मागणी केली.
दरम्यान, गेल्या ४/५ दिवसांपासून झालेल्या संततधार पावसामुळे बीड जल्हिामध्ये सर्वत्रच शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उपजाऊ मातीसह जमीन वाहून गेल्यामुळे पुढील काळासाठी काही क्षेत्र उजाड झाली आहेत. काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे तसेच गुरे दगावले असल्याची माहिती येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. झालेल्या नुकसानीचे फोटो व व्हिडिओ स्वतःकडे जतन करून ठेवावेत, तसेच नुकसानीबाबतची तक्रार फोटो, व्हीडिओसह तहसीलदार यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर करावी. या प्रक्रियेत कुठलीही अडचण आल्यास माझ्या कार्यालयाशी संपर्क साधून मदत घ्यावी, असे अवाहनही खा. बजरंग सोनवणे यांनी जल्हिातील शेतकरी व नागरिक यांना केले आहे.

# सोयाबीन पाण्याखाली शेतकरी आर्थिक संकटात

## पंचनामे करून नुकसानभरपाईची लिंबागणेश येथील शेतकऱ्यांची मागणी : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । महाराष्ट्र आरंभ न्यूज**

गेल्या ३-४ दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीतील फुलोऱ्यापासून शेंगा लागण्याच्या अवस्थेत असलेले सोयाबीन, मुग, उडीद आदी पिके पाण्याखाली गेली आहेत. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिक वाया जाण्याची भीती आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी रामकिसन गिरे, रामचंद्र मुळे, रामदास मुळे, अभिजित गायकवाड, जितेंद्र निर्मळ, बाबु आण्णा वायभट, राजेभाऊ गिरे, श्रीहरी निर्मळ, चिंतामण गिरे, अक्षय वायभट आदींनी केली आहे.



**सोयाबीनला बुरशी लागली; पिक वाया : रामकिसन गिरे**

सलग पावसामुळे सोयाबीनमध्ये पाणी साचल्याने मुळांना बुरशी लागली आहे. मुळांना गाठी येऊन वाढ खुंटली असून पिक वाया गेले आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी रामकिसन गिरे यांनी केली. दरम्यान, रामचंद्र मुळे यांनी मागील २-३ वर्षांपासून शासन पंचनामे करूनही शेतकऱ्यांना नुकसानभरपाई न मिळाल्याचे सांगितले.

**ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसानभरपाई द्यावी : डॉ.गणेश ढवळे**

बीड जिल्ह्यातील बहुतांश गावांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिक पूर्णपणे वाया गेले आहे. शासनाने पंचनाम्याचे आदेश दिले तरी ते प्रत्यक्षात होत नसल्याचे दिसून येते. शेतकरी आर्थिक संकटात सापडले असल्याने शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

# मांजरा धरण भरल्याचा आनंद आहे : आडसकर

## जेष्ठ नेते रमेशराव आडसकर यांच्या हस्ते मांजरा धरणाचे जलपूजन संपन्न



**केज । महाराष्ट्र आरंभ न्यूज**

धनेगाव येथील केज सह अंबाजोगाई, लातूर येथील जलवाहिनी समजले जाणारे मांजरा धरण पुर्ण क्षमतेने भरले आहे. हा एक सर्व शेतकरी बांधवांसाठी आनंदाची बाब असून शेतकरी बांधवावर निसर्गाची कृपा कायम रहावी असे उद्गार रमेशराव आडसकर यांनी धनेगाव येथील मांजरा धरणाच्या जलपूजन करते वेळी व्यक्त केले. मागील काही दिवसांत भरपूर पाऊस झाल्याने अनेक शेतकर्यांचे पिक गेले आहेत. त्यांचे पंचनामे करणे सुरू आहे. मी स्वतः उप मुख्यमंत्री अजित दादा पवार यांना भेटून पिडीत शेतकर्यांना मदत मिळावी यासाठी प्रयत्न करणार आहे, असेही रमेशराव आडसकर यांनी उपस्थित शेतकरी यांना आश्वासन दिले.

तसेच मांजरा धरण भरले आहे. व पाऊस काळ चांगला झाला आहे. त्यामुळे उसाचे पिक चांगले रहाणार आहे.अंबा सहकारी साखर कारखाना परिसरातील सर्व उस नेण्यासाठी तत्पर असून चांगला भाव देण्याची हमी देखील रमेशराव आडसकर यांनी दिली आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी आनंद व्यक्त केला आहे. मांजरा धरणाच्या जलपूजन प्रसंगी रमेशराव आडसकर यांच्यासोबत अंकुश अण्णा इंगळे कृ. उ.बा.स. सभापती केज, ऋषीकेश भैय्या आडसकर, राजाभाऊ अवताडे रा.कॉ.ता. अंबाजोगाई, बालासाहेब शेप सरपंच, अमर भैय्या पाटील रा.कॉ.पा.ता.अ. केज, संभाजी इंगळे, खोडसे मामा, तपसे, काळदाते यांच्या सह शेतकरी कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सौ.के.एस.के. महाविद्यालयात एड्स जनजागृतीपर कार्यक्रम अंतर्गत व्याख्यान संपन्न



**बीड । महाराष्ट्र आरंभ न्यूज**

सौ.के.एस.के.महाविद्यालयात जिल्हा एड्स नियंत्रण विभाग जिल्हा रूग्णालय, बीड व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एचआयव्ही / एडस जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर होते. तर प्रमुख वक्ते, मार्गदर्शक म्हणून जनार्धन माचपल्ले होते. त्यांनी मार्गदर्शनपर भाषणात माणसामाणसातील असमानता संपवून एड्स सारखा रोग संपवला पाहिजे. एड्स रोगाविषयी समाजामध्ये जनजागृती करून या रोगाच्या नियंत्रणासाठी विवाहपूर्व तपासणी करून घेतली पाहिजे. तसेच हा रोग असंसर्गीय रोग आहे, या संबंधी जनजागृती झाली पाहिजे असे मत व्यक्त केले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना एकात्मिक समुपदेशन व चाचणी केंद्र २ जिल्हा रूग्णालय, बीड यांनी आयोजित केलेल्या या जनजागृती कार्यक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांनी समाजाच समुपदेशन करून या कार्यक्रमा अंतर्गत आरोग्या विषयी, रोगा विषयी समाजाच समुपदेशन कराव. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी अशा कार्यक्रमात जास्तीत जास्त सहभागी होण्याचे आव्हान केले. एडस रोगावर उपायासाठी स्वयंसेवकाची भूमिका महत्वाची आहे, यावेळी ते म्हणाले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. ए.एस.खान, उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर यांची प्रमुख उपस्थिती होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.यादव घोडके यांनी तर आभार डॉ.प्रकाश गायकवाड यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ.पल्लवी इरलापल्ले, डॉ.सय्यद इमाद आणि डॉ.प्रमोद गायके, प्रा.जयंत साठे यांनी परिश्रम घेतले.

# शिक्षकांचे सर्व प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडवणार

## कास्ट्राईबच्या बैठकीत सीईओचा निर्णय

**बीड । महाराष्ट्र आरंभ न्यूज**

कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाची बैठक मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीमध्ये प्रामुख्याने शिक्षण विभाग (प्रा.) मधील प्रलंबित प्रश्नावर चर्चा करण्यांत आली. शिक्षकांच्या प्रश्नांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा सकारात्मक दृष्टीकोन दिसून आला. संघटनेच्या मागणी नुसार बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक मंजूरी समिती रदद् करण्यांत यावी. समितिच्या बैठका वेळेवर होत नसल्यामुळे संचिका मंजूरीस विलंब होतो. विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सादर होणाऱ्या संचिका विहित वेळेत सादर व्हाव्यात. गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्या खेरीज शिक्षक तसेच इतर विभागातील कर्मचारी यांना चौकशीपुर्व निलंबित करण्यांत येऊ नये. वरिष्ठ व कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पदोन्नती, केंद्रप्रमुख पदोन्नती, ग्रेड मुख्याध्यापक पदोन्नती पंधरा सप्टेंबर पूर्वी करण्यांत येणार, एस-१५ ची संचिका मंजूरी देण्यांत येणार, शासन निर्णयानुसार पदवीधर वेतन त्रुटीचा आदेश निर्गमित करण्यात येणार, दर्जावाढ दिलेल्या शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी देण्यात येणार आहे. भविष्य निर्वाह निधी कर्ज मागणी प्रस्ताव मंजूरीचे आदेश तालुकास्तरावर गटविकास अधिकारी यांना देण्याबाबत निर्णय घेण्यांत आला.

उर्वरित निवडश्रेणी व वरिष्ठ श्रेणी प्रस्तावांना सप्टेंबर अखेर मंजूरी देण्यात येणार आहे. भ.नि.नि. स्लिप २०२४ - २०२५ सप्टेंबर अखेर पर्यंत मिळणार अशा प्रकारे शिक्षकांच्या सर्वच प्रलंबित व जिव्हाळ्याच्या प्रश्नावर बैठकीत चर्चा करण्यात येऊन प्रशासनाकडून सकारात्मक निर्णय घेतल्यामुळे संघटनेकडून मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहेमान, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) प्रदिप काकडे, शिक्षणाधिकारी (प्रा.) भगवान फुलारी यांचे अभिनंदन करण्यांत आले. या बैठकीस जिल्हा शाखा बीडचे पदाधिकारी जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब हंगे व जिल्हा सचिव राहुल सुपेकर, हकिम मनियार, झुंबर गव्हाणे, स्वामी ढोकणे, संजय दराडे, सोमनाथ तांदळे, सुर्यकांत शिंदे, अनिल गोल्हार, जलील शेख, प्रवीण सानप, बालासाहेब नागरगोजे, जयश्री बडे हे उपस्थित होते.

# महात्मा फुले यांची जमीन बिल्डर्सच्या घशात घालू नये : प्रा.लक्ष्मण गुंजाळ

**बीड । महाराष्ट्र आरंभ न्यूज**

महात्मा जोतिराव फुले यांची पुणे स्थित मांजरी (बुद्रुक) येथे सुमारे दोनशे एकर जमीन असून ती भोगवटादार म्हणून सध्या एका संस्थेकडे आहे. ही



संस्था बेकायदेशीर ठराव घेऊन बिल्डर्सला ही जमिन विकण्याच्या तयारीत आहे. तरी शासनाने यात हस्तक्षेप करून सदर बहुमूल्य किमतीची जमीन वाचवावी, असे अ.भा. माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

प्रसिद्धी पत्रकात पुढे म्हटले आहे की, महात्मा फुले यांची मांजरी बुद्रुक येथे दोनशे एकर जमीन आहे. महात्मा फुले यांनी हयात असताना या जमिनीवर शेती उत्पादन घेतले आहे. शेती विषयक अनेक प्रयोग त्यांनी येथे करून शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनासंबंधी अंधश्रद्धा दूर केल्या होत्या. ग्यानोबा ससाने आणि महादू सदू वापोले यांना बरोबर घेऊन शेत जमीन वहीत केली होती. शेतीमाल उत्पादन आणि विक्री संस्था स्थापन केली होती. आजमितिला या जमिनीची किंमत सुमारे दोन हजार कोटी रुपये एवढी आहे. सद्या ही जमीन सुभाष सामूहिक सहकारी शेती संस्था या संस्थेकडे भोगवटादार म्हणून आहे. ही संस्था बेकायदेशीरपणे ठराव घेऊन बिल्डर्स ला विकण्याच्या तयारीत आहे. हे कृत्य बेकायदेशीर आहे. एक प्रकारे सांस्कृतिक संचितावर डल्ला मारणारे आहे. तरी ही जमीन बिल्डरच्या घशात न जाऊ देता शासनाच्या कल्याणकारी धोरणाप्रमाणे या जमिनीवर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय कौशल्य विकास केंद्र स्थापन करावे. या जमिनीचे संरक्षण आणि संवर्धन करावे. महापुरुषांच्या नावे असलेल्या या जमिनीचे जतन, संवर्धन करावे आणि विकासाच्या दृष्टीने या जमिनीचा विचार व्हावा. ही जमीन बिल्डरच्या घशात जाता कामा नये, यासाठी शासनाने विक्रीवर आणि खरेदीवर प्रतिबंध करावा, असे शेवटी प्रा. लक्ष्मण गुंजाळ यांनी निवेदनात म्हटले आहे.

# शिवदास थळकरी यांची राष्ट्रवादी काँग्रेस युवक केज तालुका अध्यक्षपदी निवड

**केज । महाराष्ट्र आरंभ न्यूज**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक आघाडीच्या संघटनात्मक बांधणीस गती देण्यासाठीनुकतीच केज तालुक्यात नवीन



पदनियुक्ती करण्यात आली. शिवदास उमाकांत थळकरी यांची युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या केज तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिवदास थळकरी हे सामाजिक कार्यात नेहमीच सक्रिय राहिले असून युवकांना राजकारणात व समाजकारणात सहभागी करून घेण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. पक्षाच्या विचारधारे प्रति निष्ठा ठेवून त्यांनी विविध स्तरांवर काम केले. असून त्यामुळेच त्यांच्या वर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या नियुक्तीनंतर थळकरी यांनी पक्षश्रेष्ठीं प्रती कृतज्ञता व्यक्त केली तसेच आगामी काळात केजतालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद अधिक वाढविण्यासाठी व युवकांना राजकीय व सामाजिक क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. दरम्यान, त्यांच्या निवडीबद्दल तालुक्यातील पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी व युवकांनी आनंद व्यक्त केला असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या नियुक्तीमुळे केज तालुक्यातील युवकांमध्ये नवचैतन्य संचारेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# कृषी कार्यालयाच्या रानभाजी महोत्सवास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद

**माजलगाव । महाराष्ट्र आरंभ न्यूज**

रानभाज्याची आपल्या आहारात समावेश केल्यामुळे आपले आरोग्य अबाधित राखले जाते असे प्रतिपादन आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी पंचायत समिती माजलगाव येथे तालुका कृषी अधिकारी कार्यालय माजलगाव यांनी काल दि १८ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित केलेल्या रानभाजी महोत्सव मध्ये केले. रानभाजी महोत्सव चा उद्घाटन आमदारश्री प्रकाशदादा सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. पुढे बोलताना रानभाज्या नैसर्गिकरित्या आपल्या शेतशिवारामध्ये उपलब्ध होत असून त्यावर कसल्याही प्रकारच्या कीटकनाशकांचा वापर केला जात नाही तसेच या रानभाज्यामध्ये विविध प्रकारचे विटामिन्स, खनिजे, प्रथीने असल्यामुळे आपल्या आरोग्यास लाभदायक असतात या रानबाजासाठी ग्राहक आणि उत्पादक साठी सुविधा उपलब्ध करून दिल्यास अनेकांना फायदा होईल असे सांगितले.



कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री गणेश बादाडे तालुका कृषी अधिकारी माजलगाव यांनी करताना विविध भाज्यांचे महत्त्व आणि त्यांच्या रेसिपी याविषयी माहिती सांगितली. श्रीमती श्रद्धा भवारी उपविभागीय कृषी अधिकारी माजलगाव यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना रानभाज्या आणलेल्या शेतकरी, शेतकरी गट, महिला बचत गटांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून प्रशासक तथा गट विकास अधिकारी माजलगाव श्रीमती ज्योत्स्ना मुळीक आणि पंचायत समितीचे माजी उपसभापती मनसबदार उपस्थित होते. यावेळी श्री जागृत खेडकर मंडळ कृषी अधिकारी माजलगाव, दत्तप्रसाद भोसले मंडळ कृषी अधिकारी गंगामसला, गोपीनाथ पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक माजलगाव अण्णासाहेब जगताप, पुरस्कार प्राप्त शेतकरी तसेच कृषी विभागातील सर्व उप कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, आत्मा कर्मचारी आणि तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर शेतकरी, पत्रकार उपस्थित होते.

यावेळी रानभाजी स्टॉल लावलेल्या शेतकऱ्यांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढून त्यांचे प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आले तसेच सर्व सहभागी महिला बचत गट, शेतकरी यांना उत्स्फूर्त सहभाग घेतल्याबद्दल प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. रामबाजी स्टॉलला शहरातील अनेक शाळेचे व महाविद्यालयाच्या विद्यार्थी यांनी भेट देऊन रानभाज्याचे महत्त्व जाणून घेतले. या रानभाजी महोत्सवमध्ये जवळपास ४० प्रकारच्या भाज्या उपलब्ध होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरव बापमारे उप कृषी अधिकारी माजलगाव यांनी केले आभार आतिश चाटे मंडळ कृषी अधिकारी केसापुरी यांनी मानले.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांचे सरसकट तात्काळ पंचनामे करून हेक्टरी एक लाख रुपयांची मदत द्यावी : अशोक डक

**माजलगाव । महाराष्ट्र आरंभ न्यूज**

गेल्या तीन-चार दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या अतिवृष्टीमुळे केवळ शेतीच नव्हे तर रस्ते, नदी-नाल्यालगतची जमीनही मोठ्या प्रमाणावर वाहून गेली आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांनी शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी अशी मागणी केली आहे.



१३ ऑगस्टपासून सलग पडणाऱ्या पावसामुळे तालुक्यासह जिल्ह्यातील १७ महसुलमंडळात अतिवृष्टी झाली. परिणामी शेतकऱ्यांच्या हातात आलेले सोयाबीन, कापूस, तूर, बाजरी ही पिके पाण्याखाली गेली असून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. नदी-नाल्यालगत असणाऱ्या शेतजमिनी खरडून गेल्या आहेत. याशिवाय गावांना शहराशी जोडणारे रस्ते तसेच शेतात जाणारे पायवाटेचे रस्ते वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे हाल झाले आहेत. त्यामुळे शासनाने तातडीने या रस्त्यांची दुरुस्ती करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, तसेच अतिवृष्टीग्रस्त सर्व शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी अशी मागणी अशोक डक यांनी केली आहे.

# डोईफोडवाडी येथे उद्धव महाराज चोले यांचे कीर्तन संपन्न

**बीड । महाराष्ट्र आरंभ न्यूज**

बीड तालुक्यातील डोईफोडवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह गेली तीस वर्षापासून चालत आलेला आहे याही वर्षी या सप्ताहाची सुरुवात मोठ्या उत्साहात झाली आहे सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी ची किर्तन सेवा ह भ प उद्धव महाराज चोले खडकी घाट यांनी केलेली आहे.



याविषयी सविस्तर माहिती अशी की श्रावणी सोमवारचं प्रसंगावधान पाहून शिवभोळा चक्रवर्ती माझे चित्त त्याच्या पायी या अभंगावर सविस्तर असं विवेचन केले यावेळी बोलताना महाराज म्हणाले की माणूस कुणालाच भेत नाही परंतु मरणाला भितो मरणाची भीती टाळण्यासाठी शिव आराधना करणे आवश्यक आहे. यामुळे भीती टळते पण मरण मात्र टळू शकत नाही मरण येणारच याबरोबरच महाराजांनी व्यसनाधीनता व व्यसनाधीनतेने तरुण पिढी कशी बरबाद झाली आहे तसेच सामाजिक समता व मानवी वर्तन या सर्व विषयांना हात घातला यावेळी गावातील तरुण मंडळी, भजनी मंडळी, स्त्री-पुरुष व बाहेरगावची मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती अशी माहिती मा सरपंच प्राध्यापक तात्यासाहेब डोईफोडे यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिली आहे.

# विश्व हिंदू परिषदेच्या वतीने प्रफुल्ल कुलकर्णी यांना धर्मवीर जिवन गौरव पुरस्कार प्रदान

**अंबाजोगाई । महाराष्ट्र आरंभ न्यूज**

विश्व हिंदू परिषद अंबाजोगाई प्रखंड च्या वतिने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोरजी मुंदडा, डॉ.शरदराव हेबाळकर, साईनाथ उपरे, डॉ.गोपाळ चौसाळकर, प्रणव रायचुरकर, गणेश पांचाळ, चंद्रकांत घोलप, कृष्णा देशमुख उपस्थित होते. विश्व हिंदू परिषदेच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रास्ताविक डॉ. चौसाळकर, चंद्रकांतजी घोलप म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाच्या माध्यमातून हिंदू समाज संघटनाचे कार्य सुरू आहे. हिन्दु समाजासमोर अनेक समस्या आहेत त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कृष्णा देशमुख म्हणाले की, प्रफुल्ल कुलकर्णी यांनी राष्ट्र कार्यासाठी जिवन झोकून दिले. देशापुढील समस्या सोडविण्यासाठी हिंदू तरुणांनी संघटीत होऊन कार्य केले पाहिजे. समाज देश व



संस्कृती टिकली पाहिजे असे आवाहन केले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना नंदकिशोर मुंदडा म्हणाले की, समाज कार्यासाठी वेळ देणे आवश्यक आहे. साधु संतांनी समाज जोडण्याचे काम केले. प्रफुल्ल नानांनी प्रतिकूल परिस्थितीत हिंदू समाज जोडण्याचे कार्य केले, कार्यकर्ते जोडण्याचे काम केले. हा सत्कार नानांच्या लढवय्ये पणाला आहे. या कार्यासाठी कै.वहिनींची खंबीरपणे साथ होती. पालकांनी आपल्या मुलांवर उत्तम संस्कार करावेत तरच समाज एकसंघ निर्माण होईल. प्रफुल्ल कुलकर्णी म्हणाले की, हिंदू समाज जागृती चे काम केले तो खारीचा वाटा आहे. सावरकरांनी म्हटल्याप्रमाणे ज्या मार्गाने विजय मिळवता येतो तो मार्ग अवलंबला पाहिजे मला हिन्दू समाजाची साथ मिळाली म्हणूनच कार्य करु शकलो. आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपला पाहिजे. पण आमचा शत्रूबोध संपल्यामुळे हिंदू समाज संघटीत होण्यास अडचण होत आहे. समाजात काम करतांना समाज हित जोपासले गेले पाहिजे असे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ.हेबाळकर म्हणाले की, मला कार्यकर्त्यांचे कौतुक करण्याची संधी मिळाली व्यापक मंथन झाले. देशात हिंदूंचे एक मोठे जनसंघटन व कार्यकर्ते उभे राहिले पाहिजे. तरच समाज उभा राहिल. हे कार्य संघाने उभे केले. अशा कार्यकर्त्यांपैकी एक प्रफुल्ल कुलकर्णी होत. हिन्दू एकजुट च्या माध्यमातून अनेक तरुण जोडले त्याचेच रूपांतर नंतर बजरंग दलात झाले. मी समाजासाठी काय करू शकतो याचा विचार केला पाहिजे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.आरती सोनेसांगवीकर, तर आभार प्रदर्शन जयदीप चिलमे यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन ॲड कल्याणीताई विर्धे यांनी केले. याप्रसंगी सर्व हिन्दूत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी साईनाथ उपरे यांच्या वतीने गौशाळे साठी मोफत औषधी वाटप करण्यात आली.

## कौवडगाव (हुंडा) घटनेत डीवायएसपी शिंदे, एपीआय दहिफळे यांनी स्वत: पुर प्रवाहात उतरुन वाचवले तिन तरुणांचे प्राण

# खाकी वर्दीतल्या माणुसकीला व ग्रामस्थांना माझा सलाम

### आ. धनंजय मुंडे यांनी केले त्या पोलीस अधिकाऱ्यांचे कौतुक; विशाल बल्लाळ याला वाचवु शकलो नाही याची मनात खंत : पीआय गोरखनाथ दहिफळे





**सिरसाळा | महाराष्ट्र आरंभ न्यूज**
परळी तालुक्यातील कौवडगाव (हुंडा) ता.परळी वैजनाथ जि.बीड परळी हादरलं लगनावरुन परतताना जिप पुरात वाहून गेली. तिघे जन बचावले, एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने परिसरात एकच खळबळ पुर्ण परिसरा शोकाकुळ झाला असून बचाव कार्य सुरू करण्यात आले. प्रशासन, स्थानिक नागरिक, बचाव पथक आणि एनडीआरएफच्या टीमने युद्ध पातळीवर काम केले. या बचाव कार्यात तरुणाना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. यामध्ये अमर पोळ, राहुल पोळ आणी राहुल नवले यांचा समावेश आहे. दुर्दैवाने विशाल बल्लाळ या तरुणाचा मृत्यू झाला. या मोहिमेत पोलिसांनी विशेष धाडस दाखवले.

उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे, सिरसाळा सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे आणि पोलीस अमलदार उत्तरेश्वर केदार यांनी स्वतःच्या जीवाची परवाना करतात नदीच्या प्रचंड प्रवाहात उडी मारून एका तरुणाला वाचवले. त्याचे हे शौर्य खऱ्या अर्थाने आदिमानस्पद आहे. यासोबत पोलीस वाहक चालक सपोउपनि धनराज सोडगीर यांनी पिए सिस्टीमचा वापर करून पाण्यात अडकलेल्या तरुणांना सतत धीर दिला. ज्यामुळे त्यांचे मनोबल कायम राहिले. या बचाव कार्यात सहभागी झालेल्या सर्व प्रशासकीय अधिकारी, पोलीस दल स्थानिक नागरिक आणि संयम सेवकाचे मनपूर्वक आभार मानले जात आहेत.

खाकी वर्दीतील ही माणुसकी आणि कर्तव्यनिष्ठा समाजासाठी एक आदर्श उदाहरण आहे. या घटनेतील रात्री १२ ते १५ दुपारी डेड बॉडी मिळेपर्यंत त्या ठिकाणी रात्रभर पावसात उभे असलेले परळी मार्केट कमिटी संचालक राजाभाऊ (चाचा) पौळ, कवडगाव सरपंच दिलीप राठोड आचार्य टाकळी चे चेअरमन तुकाराम आचार्य यांनी भर पावसामध्ये मदतीचा हात दिला आहे. सकाळी आठ वाजता जिल्हा परिषद सदस्य व गटनेते अजय मुंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाण्याच्या पुरातून बाहेर काढलेल्या तरुणांशी संवाद साधला व तात्काळ प्रशासनाला सूचना दिल्या व यामध्ये गावातील ग्रामस्थ यावेळी मदतीस उभे होते. बीडमध्ये माणुसकी आणि शौर्याची गाथा पोलिसांच्या धाडसी कामगिरीमुळे वाचले तीन जिव पोलिसांनी दाखवलेल्या माणुसकी आणि शौर्याचे सर्वत्र कौतुक होत आहे ही घटना मध्यरात्री घडली. घटनेची माहिती मिळताच तात्काळ डीवायएसपी व तहसील कार्यालय परळी बीड येथून आलेले पथक व शिरसाळा पोलीस स्टेशनची पूर्ण टीमने बचाव कार्य सुरू करण्यात आले. अशी माहिती प्रशासनाकडून मिळाली आहे. सोमवारी सकाळी उजेड पडतात परळी नगरपरिषद, अग्निशामक दल, बीड भोई समाजाची पोहनेर गावचे युवक व ग्रामस्थांनी शोध मोहीम राबवली. परंतु बल्लाळ बेपत्ता राहिला. अखेर दुपारी १२.१५ वाजून च्या सुमारास घटनास्थळापासून तब्बल दोन किमी अंतरावर त्याचा मृतदेह आढळला.

**तात्परता आणि मदत कार्य**
घटनेनंतर उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, परळी तहसीलदार व्यंकटेश मुंडे, स्थानिक प्रशासन व जनप्रतिनिधी घटनास्थळी धाव घेतली. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माहितीनुसार एन.डी.आर.एफ. टीम पुण्याहून रवाना करण्यात आली होती. जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक बीड तसेच परळी आमदार धनंजय मुंडे यांनी सतत संपर्क ठेवून आवश्यक मार्गदर्शन केले. ग्रामस्थांच्या धाडसी सहभाग लक्षवेधी ठरला. राजेभाऊ (चाचा) पौळ, दत्ता गव्हाणे, दिलीप राठोड, बोरखेडे, आचार्य टाकळीचे चेअरम तुकाराम आचार्य, कदम, ओम गव्हाणे, सेवा शोषित चेअरमन तुकाराम गव्हाणे, प्रदीप पवार, बाळासाहेब राठोड यांच्यासह अनेकांनी पुरात उतरून बचाव मोहीम सुरू केली व जीव धोक्यात घालून हातभार लावला.



## स्वातंत्र्यानंतरही शालेय मुलांचा नदीपात्रातून जिवघेणा प्रवास थांबेना; दुर्दैवी घटना घडल्यावर नदीवर पुल होणार का?

**आष्टी | महाराष्ट्र आरंभ न्यूज**
स्वातंत्र्य मिळून अनेक वर्ष लोटली, सोयी सुविधा आल्या, पण ग्रामीण भागातील वस्तीवर राहणाऱ्या लोकांच्या दळण, वळणाकडे मात्र प्रशासनाचे आजही दुर्लक्ष असल्याचे दिसुन येत आहे. पावसाळ्यात पाण्यातून वाट काढत जीवघेणा प्रवास करणाऱ्या बडेवस्तीवरील लेकरांना असा धोकादायक प्रवास करावा लागत असून एखाद्या शालेय मुलाचा जिव गेल्यानंतर प्रशासन नदीवर पुल उभारणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी येथील मारूती मंदिर वस्ती असून या ठिकाणी २५ कुटुंब वास्तव्यास आहेत. त्याच बरोबर मोठ्या प्रमाणावर शेतजमीन आहे. स्वातंत्र्य मिळून देखील आजपर्यंत या ठिकाणी असलेल्या वस्तीवरील नागरिकांना व शालेय मुलांना दळण वळण करण्यासाठी नदीवर पुल नसल्याने अनंत अडचणीचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात नदीला पाणी आल्यानंतर शालेय मुलांना जीव धोक्यात घालून याच नदीच्या पाण्यातून वाट शोधत शाळा गाठावी लागते. जिल्हा परिषद, तहसीलदार यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करून देखील कसलीच दखल घेतली जात नाही. प्रशासनाने आता अंत न पाहता तातडीने नदीवरील पुलासाठी मंजुरी देऊन प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी येथील सरपंच अशोक शेकडे यानी केली आहे.

**आमच्या लेकराचं बर वाईट झाल्यावर पुल होणार का?**
या आमच्या वस्तीवरून मुलांना शाळेत पाठवताना अंगावर काटा उभा राहतो. वाहत्या पाण्यातून लेकरांना जीव धोक्यात घालून वाट शोधत पाठवावे लागते. गेंड्याची कातडी पांघरलेल्या प्रशासनाला आमच्या लेकराचं काही बरं वाईट झाल्यावर पुल उभारण्यासाठी जाग येईल का असा प्रश्न पालक परमेश्वर बडे यांनी उपस्थित केला आहे.

## शंभर कोटी मंजूर केल्याच्या जीआर दाखवा नसता बीडकरांची माफी मागा

### राष्ट्रवादीचे स्थानिक पुढारी अजित दादांचे नाव खराब करत आहेत : सचिन मुळूक



**बीड | महाराष्ट्र आरंभ न्यूज**
बीड शहरातील रस्त्यांसाठी १०० कोटींचा निधी मिळाल्याचा दावा राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी करून बीडच्या नागरिकांची दिशाभूल केली आहे. असा कुठलाही जी.आर. किंवा निधी मंजुरीचे पत्र नसताना उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी शंभर कोटी मंजूर केले अशा चुकीच्या बातम्या देऊन अजित दादांचं नाव खराब करत आहेत तसेच मंजूर नसलेल्या कामाचे श्रेय लाटण्याचा हा प्रकार म्हणजे उताविळ नवरा गुडघ्याला बाशिंग असा आहे. राष्ट्रवादी चे स्थानिक पुढारी बीडच्या नागरिकांची फसवणूक तर करतच आहेत तसेच खोट्या बातम्या देऊन अजितदादांचं नाव खराब करत आहेत. राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी बीडच्या शंभर कोटींच्या कामाचा जीआर चोविस तासात प्रसिद्ध करावा नसता बीडकरांची माफी मागावी असे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी म्हटले आहे. उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित दादा पवारांकडे पाठपुरावा केलाही असेल परंतु राष्ट्रवादीचे स्थानिक नेते शंभर कोटींचा निधी मंजूर केल्याचा थेट बनाव करुन बीडकरांना गाजर दाखवत आहेत असेही मुळूक म्हणाले. बीडकरांची दिशाभूल करण्याचा सक्षम वारसा चालवत असल्याचे स्पष्ट झाले आहे. राष्ट्रवादी पक्षांतर्गत एकमेकांचे कट्टर विरोधकांनी जनतेसमोर निधी मंजूर केल्याचा बनाव उभा केला. परंतु बीडची जनता आता दूध खुळी राहिली नाही त्यामुळे खरोखरच निधी मंजूर झाला आहे का, हा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित झाला आहे. शहरातील कचऱ्यासारखी वस्तुस्थिती डोळ्यासमोर असताना कोटी कोटींचा निधी आणला हा राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांचा दिखावूपणा आहे असेही शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी म्हटले आहे. केवळ माध्यमांसमोर मोठमोठे दावे करणे आणि नागरिकांना गोंधळात टाकणे ही पद्धत बंद करावी. जी.आर.शिवाय केलेले सर्व दावे हे केवळ बनाव आणि राजकीय दिखावा आहेत. जनतेला गोंधळात टाकणे आणि स्वतःची पाठ थोपटणे थांबून अजितदादा सारख्या सक्षम नेतृत्वाचं नाव खराब करू नये असा माझा त्यांना मित्रत्वाचा सल्ला आहे, असे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले आहे.



## शासनाने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी : राजेंद्र मस्के

**बीड | महाराष्ट्र आरंभ न्यूज**
मे महिन्यात पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचा फायदा झाला. परंतु १३ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील १७ महसूल मंडळांत अतिवृष्टीची झाल्याची नोंद समोर आली आहे. अतिवृष्टीचा जिल्हाभरातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. शेत पिके, शेतजमीन, तर अनेक ठिकाणी रस्ते व पुलांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती लक्षात घ्यावी. व तातडीने पंचनामे करून शासनाने मदत जाहीर करावी. तसेच ग्रामीण भागातील रस्ते पुल सुधारणांसाठी विशेष निधीची तरतूद करावी, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केली आहे.

संपूर्ण जिल्हाभरात कोसळलेल्या अतिवृष्टी मुळे कापूस सोयाबीन, तूर, उडीद, मूग, बाजरी या सारख्या उभ्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते झाले. असून काही ठिकाणी फळबागांचे ही नुकसान झाले आहे. शेत जमिनी वाहून गेल्या तर काही ठिकाणी जलमय परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे नुकसान झाले. ग्रामीण भागातील रस्ते व पूलांचे अतोनात नुकसान झाले. शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी पंचनामे करून तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी.

## ना. पंकजाताई मुंडे यांना 'कोहिनूर ऑफ इंडिया' अवॉर्ड

### लोकमत वृतपत्र समुहाने केला सन्मान; लंडन येथे पार पडला दिमाखदार सोहळा



**मुंबई | महाराष्ट्र आरंभ न्यूज**
राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना त्यांच्या खात्यातील उत्कृष्ट कामाबद्दल लोकमत वृतपत्र समुहाच्या वतीने 'कोहिनूर ऑफ इंडिया' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. लंडन येथे काल एका दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार देण्यात आला. लोकमत वृतपत्र समूहाच्या वतीने लंडन येथे आयोजित करण्यात आलेल्या 'लोकमत ग्लोबल इकॉनॉमिक कन्व्हेन्शन' ही जागतिक परिषद पार पडली.

ज्यांनी आपल्या कार्यातून देशाचे नाव जागतिक स्तरावर उज्ज्वल केले आहे अशा व्यक्तींना लोकमत वृतपत्र समूहाने 'कोहिनूर ऑफ इंडिया' या पुरस्काराने सन्मानित करण्याचे ठरवले होते. ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या कुशल व अभ्यासू मार्गदर्शनखाली पर्यावरण व पशुसंवर्धन विभागात उल्लेखनीय काम करून एक नवा आयाम प्रस्थापित केल्याबद्दल त्यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला. लोकमत वृतपत्र समूहाचे अध्यक्ष विजय दर्डा यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी लोकमत चे एडिटर इन चीफ राजेंद्र दर्डा उपस्थित होते.

**चर्चासत्रातही सहभाग**
महिलांनी मूल्यसंस्कार, देशाची समृध्द संस्कृती आणि वारसा जपत उद्योग, व्यवसाय आणि अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान दिले आहे, या विषयावर परिषदेत एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते, यातही ना. पंकजाताई मुंडे यांनी सहभाग घेत आपली सडेतोड भूमिका मांडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या संधीमुळे राज्याच्या विकासात्मक प्रक्रियेत मला योगदान देता येत आहे. आजपर्यत केलेल्या कार्याचा आणि माझ्या पाठिशी ठामपणे उभे राहणाऱ्या प्रत्येकाचा हा सन्मान आहे, असं ना. पंकजाताई मुंडे यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटलं आहे.

## आमची मुलगी आम्हाला मिळवून द्या; आम्हाला न्याय हवा, म्हणत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पिडीत कुटुंबाचे उपोषण

### दीड महिन्यांचा कालावधी उलटूनही अंभोरा पोलिसांना अपहरण झालेल्या मुलीचा शोध लागेना!



**आष्टी | महाराष्ट्र आरंभ न्यूज**
महाविद्यालयातून घरी आल्यानंतर घरी कोणी नसल्याची संधी साधुन अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवून नेल्याची घटना घडून दीड महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरी देखील अंभोरा पोलिसांना पळवून नेलेल्या मुलीचा शोध लागत नसल्याने पोलिसांच्या तपासावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले. आमची मुलगी आम्हाला मिळवून द्या; आम्हाला न्याय हवा, म्हणत तिच्या शोधासाठी पिडीत कुटुंब जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवार १८ ऑगस्टपासून उपोषण सुरू केले आहे. आष्टी तालुक्यातील एका गावातील १७ वर्षीय मुलीचे तिच्याच गावातील तरूणाने फूस लावून पळवून नेल्याची घटना २ जुलै रोजी घडली. ३ जुलै रोजी अंभोरा पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल झाला. आजपर्यंत पोलिसांना या अपहरण झालेल्या मुलीचा शोध लागला नसून अनेक वेळा पोलिस ठाणे, पोलीस अधीक्षक याच्याकडे अर्ज करून प्रत्यक्ष भेटून तपासत कसलीच प्रगती झाली नाही. माझ्या मुलीच्या जीवाला व आरोग्याला धोका आहे. पोलिस तपासात हालगर्जीपणा करत आहेत. आम्ही मानसिक त्रासात असून आमच्या मुलीचा शोध आजपर्यंत लागला नसल्याने पिडीत मुलीचं कुटुंब सोमवारी पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कुटुंबासह उपोषणास बसले आहे.

## मेंढपाळानी मेंढ्यासाठी मोफत औषध, लसीचा लाभ घ्यावा : प्रकाश जाडकर

### आ.नमिता मुंदडा यांच्या हस्ते मेंढपाळांच्या मेंढ्यासाठी औषधी व लसीचे मोफत वाटप



**केज | महाराष्ट्र आरंभ न्यूज**
बीड जिल्ह्यात सततचा पाऊस चालू असल्यामुळे बीड जिल्ह्यातील मेंढपाळांच्या मेंढ्यांना साथ रोगांचे आजार होत आहेत. केज मतदार संघाच्या आमदार सौ नमिताताई मुंदडा यांनी महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभागाला तातडीच्या सूचना देऊन मेंढ्यांना रोग प्रतिबंधक लस उपलब्ध करून मेंढपाळांच्या मेंढ्यांना लसीचा डोस पाजून आमदार सौ नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते कुंबेफळ येथे झाला.

यापूर्वी मेंढपाळांना खाजगी रुग्णालयातून औषधी आणून हजार रुपये खर्च करावे लागत होते. आता मोफत औषध उपचार व लसी देण्यात येत आहेत याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार नमिता मुंदडा यांनी केले. मेंढपाळ बांधवांनी मोफत औषध उपचार व लसी घ्याव्यात असे आवाहन प्रकाश जाडकर यांनी केले. कुंबेफळ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी चंदनसावरगाव पशुधन पर्यवेक्षक डॉ. अनिकेत काटुळे, भाजप ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष प्रकाश जाडकर, सुरेश नांदे, गोपाळ मस्के, विष्णू थोरात, रामकृष्ण भंडारे, संदीप थोरात व परिसरातील मेंढपाळ उपस्थित होते.

## आदिवासी भिल्ल समाजाचे प्रश्न लवकरच मार्गी लावण्याचे तहसीलदारचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब पिंपळे ना आश्वासन!



**दौलावडगाव | महाराष्ट्र आरंभ न्यूज**
शासकीय योजनेपासून गेल्या अनेक वर्षांपासून वंचित राहिलेल्या आदिवासी भिल्ल समाजातील लोकांचे प्रश्न लकरच मार्गी लावून लोकवस्तीवर दळण वळणासाठी देखील प्रयत्न करण्यात येईल असे आश्वासन आष्टीच्या तहसीलदार यांनी एकलव्य संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब पिंपळे यांना दादेगांव येथे दिले.

आष्टीच्या तहसीलदार वैशाली पाटील या मंगळवारी आष्टी तालुक्यातील विविध गावातील आदिवासी भिल्ल समाजातील वस्तीवर जाऊन अडीअडचणी, शासकीय सोयीसुविधा यासह अनेक गैरसोयी असल्याने त्यांनी भिल्ल समाजातील लोकांच्या समस्या ऐकुन घेण्यासाठी आल्या होत्या.यावेळी एकलव्य भिल्ल समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब पिंपळे यांनी लोकांना आधार कार्ड काढून देणे, नवीन शिधापत्रिका देणे,जातीचे प्रमाणपत्र, वस्तीवर जाण्यासाठी रस्त्याची सोय करणे, यासह अनेक अडचणी सोडवण्याची मागणी केली. त्यानंतर तहसीलदार यांनी महसूल स्तरावरून जे जे कामे शक्य आहेत. ते लवकरच मार्गी लावू असे आश्वासन दिले. यावेळी मंडळधिकारी नवनाथ औंदकर, संजय निंबाळकर( पोलिस पाटील दादेगांव) एकलव्य संघटनेचे तालुकाध्यक्ष शंकर बर्डे, बन्सी गायकवाड, पंडित गायकवाड, विश्वनाथ बर्डे, बाळू बर्डे, सिंधूबाई गायकवाड, युवानेते यमाजी गायकवाड, महादेव बर्डे, गोविंद बर्डे यासह महिला, पुरूष उपस्थित होते.

## अजित दादांचं काम बीडच्या नागरिकांसाठी, बीडच्या विकासासाठी निधी ना. अजित दादांनी दिला

### उठ सूठ कोणीही श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये : शेख निजाम



**बीड | महाराष्ट्र आरंभ न्यूज**
बीड वासियांसाठी अत्यंत चांगली बाब घडलेली आहे. ना. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले व त्या अनुषंगाने आपल्या कार्याची छाप सोडण्यास सुरुवात केली. मा. अजित दादा यांनी प्रत्येक घटकापर्यंत सर्वांगीण विकास कसा पोहोचेल यासंबंधीचा वाटचाल सुरू केलेली असून बीड जिल्ह्यातील व बीड शहरातील प्रत्येक अविकसित घटकाचा भागाचा राहिलेला विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न करीत असल्याचे जनतेस दिसत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून बीड शहरातील रस्ते नाल्या व इतर पायाभूत सुविधा करिता ना. अजित पवार साहेब यांनी विमानतळ, रेल्वे चे जलद गतीने काम, १०० कोटी रु निधी नगरउत्हान योजना, २५ कोटींहून अधिक स्टेडियम साठी, टाटा समूह व शासनाकडून एनोवेशन सेन्टर २०० कोटीं, खासबाग ग्राउंड, शहरतील तीन ठीकाणी नाना नानी पार्क व गार्डन नगरपरिषद अंतर्गत विविध विकास योजनेतून भरपूर निधी चे प्रस्ताव असे अनेक लोकविकास कामांचा धडाका दादांनी सुरु केला आहे.

अजित दादा यांनी दिलेल्या निधीबद्दल अचानक पणे, भलत्यांनाच श्रेयवाद घेण्याच्या उकळ्या फुटत आहे. मागील ३५ ते ४० वर्षापासून एक हाती स्वतःच्या घरात सत्ता असताना सुद्धा त्यांना बीड शहराचा विकास करता आला नाही व ज्यांनी बीड जिल्हा बीड मतदार संघ व बीड शहर चूरून खाल्ले तेच आता शहराच्या विकासा च्या गप्पा मारताना दिसत आहे. यापूर्वी झालेल्या भुयारी गटार योजना, अमृत अटल योजना, वाढीव अमृत अटल योजना, नगरोत्थान योजना, यु आय डी एस एस एम टी पाणीपुरवठा, योजना दलित वस्ती नागरी सुधार योजना, यासारख्या अनेक योजना व बीड शहरातील महत्त्वा च्या रस्ते व नाल्यांचे किती टेंडर व किती रक्कम कोणी कित्येक वेळेस बिले काढून खाल्ली हे सर्व बीडच्या जनतेस माहित आहे. बीड च्या प्रस्तावित कुटुंबातील भावंडे एकमेकांवर आरोप करून लोकांना मूर्ख बनवण्याचे काम करीत आहे. चार दशक सत्ता एक हाती आहे परंतु विकास तर दिसत नाही शहर भकास असल्याचे दिसत असून यांनी अनेक काम चालू व बंद करण्यासाठी ची टक्केवारी कोणी घेतली याची सुद्धा जाणीव बीड शहरातील जनतेला आहे.

कामाचा माणूस अजित दादा यांनी दिलेल्या बीडच्या विकासासाठी चा निधी स्वतः आणला आम्ही केले असे वर्तमानपत्र व समाज माध्यमांमधून प्रसारित करून आयत्या पिठावर रेगोट्या मारण्याचे काम प्रस्थापित कुटुंबातील भावंडे करीत असल्याचे दिसत आहे. अचानकपणे भलत्याच लोकांना बीडचा विकास करण्याची उकळ्या फुटत असल्याचे सर्वसामान्य जनतेला दिसत असून जनता पालकमंत्री ना.अजित दादा पवार, मा.मंत्री आ. धनंजय मुंढे, मा.आ अमरसिंह पंडीत, विजयसिंह पंडित यांच्या सुचविले कामांनी प्रभावित झालेले असून एवढ्या वर्ष सत्ता असून शहरासाठी काहीही न करणाऱ्या प्रस्थापित भावंडांनी फुकटचा श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये असे शेख निजाम यांनी म्हटले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT